# महाराष्ट्र शासन

क्रमांकः- ससंनि०८१८/प्र.क्र.८३/१३स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७ सप्टेंबर, २०१९

**आदेश :-**

जाअर्थी; महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये गृहनिर्माण सहकारी संस्थासाठी वेगळयाने प्रकरण तेरा "ब" समाविष्ट करण्यासंदर्भातील अध्यादेश दि. ९ मार्च, २०१९ रोजी प्रख्यापित करण्यात आला. त्यानुषंगाने अधिनियम दि.२३/०७/२०१९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला. त्यानुसार कलम ७३ कब मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात आली:- " परंतु आणखी असे की, २५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सदस्य असणा-या गृहनिर्माण संस्थांच्या बाबतीत, उक्त गृहनिर्माण संस्था विहित करण्यात येईल अशा रीतीने समितीच्या निवडणूका घेईल. ; आणि

जाअर्थी, सदर सुधारणेमुळे २५० पर्यत सदस्य संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका घेण्याचे अधिकार संबधित गृहनिर्माण संस्थेला देण्यात आलेले आहेत. प्रस्तुत तरतुदी संदर्भात दि.९/०३/२०१९ रोजी अध्यादेश प्रख्यापित करण्यात आल्यापासून, गृहनिर्माण सहकारी संस्थांनी निवडणूका घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित नव्हती. त्यामुळे निवडणुका घेण्याबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली आहे; आणि

जाअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब चे पोटकलम ११ अन्वये संस्थांना निवडणूका घेण्याबाबत, दिलेल्या अधिकारानुसार, संस्थांनी निवडणुका घेण्याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी निवडणूक नियम बनवण्याची आवश्यकता होती. त्यासाठी नियमाचे प्रारुप शासनास सादर करण्यासाठी नियम समितीची स्थापना केली आहे; आणि

ज्याअर्थी, नियम समितीमार्फत शासनास नियमाचे प्रारुप सादर होणे, त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन नियम अंतिम करण्यासाठी हरकती सूचना मागविण्यासाठी राजपत्रात प्रसिद्ध करणे, आलेल्या हरकती सूचना विचारात घेऊन नियम अंतिम करणे, तसेच, महाराष्ट्र विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता सुरु होणे, यामुळे गृहनिर्माण संस्थांच्या निवडणूका घेण्याबाबतचे नियम अंतिम होण्यासाठी काही अवधी लागणार आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५७ मधील राज्य शासनास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे कोणत्याही संस्थेस किंवा संस्थांच्या वर्गास अधिनियमाच्या किंवा नियमांच्या आशयास

बाधा येणार नाही अशा फेरफारानिशी या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमध्ये निदेश देता येतील. या तरतुदीनुसार शासनास असलेल्या अधिकारात कलम ७३ कब चे पोटकलम ११ मधील तरतुदीच्या अनुषंगाने निवडणुकीस पात्र असणा-या गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या समितीच्या निवडणुका दि. ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत पुढे ढकलण्यात येत आहेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०७१२४५०३३२०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Shankarrao Shingte

Digitally signed by Ramesh Shankarrao Shingte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Cooperation, Marketing And Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fed1b2ed6e1e4aca719170d9eae8aa251ee28dc56c75d8a65acb34103d45bd48, serialNumber=b9bf7a534d8f1272bd902482bf95b556a5baefdddce18574a78fa2d8d0957d1f, cn=Ramesh Shankarrao Shingte
Date: 2019.09.07 12:56:17 +05'30'

**( रमेश शिंगटे )**
अवर सचिव तथा सहनिबंधक

**प्रति,**

१. सहकार आयुक्त निबंधक, सहकारी संस्था पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे.
३. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, साखर संकूल, शिवाजी नगर, पुणे
४. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे.
५. संचालक, हातमाग व वस्त्रोद्योग महाराष्ट्र राज्य, नागपूर
६. विभागीय सहनिबंधक कोल्हापूर, सहकारी संस्था.
७. उपनिबंधक/जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
८. निवडनस्ती-१३स.